# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्ध पत्रक

- **जल्लोष स्वच्छतेचा मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन**

देशभरातील 3 ते 10 लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये **केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण 24-25 मध्ये मिरा भाईंदर शहराने देशात प्रथम क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार पटकावला** आहे. हा पुरस्कार महानगरपालिकेचा नव्हेच, तर शहरातील प्रत्येक नागरिकाचा आहे. या यशात तुमचा प्रत्येकाचा मोलाचा वाटा आहे असे महानगरपालिकेला मनापासुन वाटते.

याच अभिमानाच्या क्षणाचे औचित्य साधून, **शनिवार, दिनांक 2 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 वाजता मॅक्सस मॉल ते मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालय या मार्गावर 'जल्लोष स्वच्छतेचा विजयी मिरवणूक'** काढण्यात येत आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या या मिरवणुकीत महानगरपालिकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने सहभागी होणार आहेत.

मिरा भाईंदर शहरातील नागरिक, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, सेवाभावी संस्था, आशा सेविका, शिक्षकवृंद, पत्रकार बांधव, विविध राजकीय, सामाजिक संघटना यांनी या स्वच्छतेच्या यशाचा सन्मान करण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका करत आहे.